ePaper

वर्ष - 9 । अंक -26 | UDYAM-MH-26-0158827

**पुढील 24 तास महाराष्ट्रासाठी धोक्याचे, आयएमडीचा धडकी भरवणारा इशारा**



# महाईन्यूज™

## आतील पानांत


- पाकिस्तान पुन्हा तोंडावर पडणार
- टीम इंडियाची सुपर फोरमध्ये धडक
- अमेरिका-भारत व्यापार करार होणार?
- TIKTOK ला अमेरिकेत नवसंजीवनी


www.mahaenews.com । मंगळवार, दि. 16 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**सरकारवर जोरदार हल्लाबोल** शरद पवार पुन्हा मैदानात!

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रोश!

## ही तर सुरुवात; नाशिकमधून सरकारला मोठा इशारा

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**नाशिकमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीनं शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रोश मोर्चा काढण्यात आला, या मोर्चामध्ये बोलताना शरद पवार यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे, त्यांनी थेट इशारा दिला आहे. नाशिकमध्ये शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये आक्रेश मोर्चा निघाला आहे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीनं आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे, या मोर्चामध्ये बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. शेतकऱ्यांच्या संकटांवर मार्ग काढण्याची जबाबदारी सरकारची आहे, राज्यातील शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे, गेल्या दोन महिन्यांमध्ये दोन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असं यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.**






### नेमकं काय म्हणाले शरद पवार?

या आक्रोश मोर्चामध्ये बोलताना शरद पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शेतकऱ्यांच्या संकटांवर मार्ग काढण्याची जबाबदारी सरकारची आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे, गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात दोन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, मराठवाड्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आम्हाला बघ्याची भूमिका घेता येणार नाही, नाशिकमध्ये ही तर सुरुवात आहे, असा इशाराही यावेळी शरद पवार यांनी सरकारला दिला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, मी कृषीमंत्री होतो, शेतकरी आत्महत्येची घटना माझ्या वाचनात आली, तेव्हा मी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना विनंती केली की शेतकरी जीव का देतो? हे समजून घेतले पाहिजे. दिल्लीत बसून हे होणार नाही, त्यासाठी जिल्ह्यांना भेटी दिल्या पाहिजे. ते तयार झाले. आम्ही नागपूर, अमरावती, यवतमाळला गेलो, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या त्यांच्या कुटुंबाला भेटलो. त्यावेळी त्या शेतकऱ्याची बायको ढसाढसा रडली, मी आत्महत्येचं कारण विचारलं, तर ती म्हणाली सोसायटीचं कर्ज काढले होते, खासगी सावकाराचं कर्ज थकलं होतं. तो येऊन भांडे घेऊन गेला, आणि इकडे मालकांनी जीव दिला. कर्जबाजारीपणा हा मोठा रोग आहे, त्याव उपचार केले पाहिजेत, म्हणून 70 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली असं यावेळी शरद पवार यांनी म्हटलं.

### नेमकं काय म्हणाले शरद पवार?

शेतकऱ्यांच्या संकटांवर मार्ग काढण्याची जबाबदारी सरकारची आहे.

## अतिवृष्टी व शेतीचं नुकसान

यंदा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. बीडसारख्या दुष्काळी जिल्ह्यातदेखील अतिवृष्टी झाली. “संकटं येतात, पण त्या संकटातून मार्ग काढणं ही राज्य आणि केंद्र सरकारची जबाबदारी असते. आज ती जबाबदारी पार पाडली जात नाही,” अशी टीका पवारांनी केली. नाशिकच्या कांद्याचा मुद्दा उपस्थित करत पवार म्हणाले, “नाशिकचा कांदा जगभर निर्यात होतो. शेतकऱ्यांना आशा असते की, कांद्याला चांगला भाव मिळेल, त्यातून संसार सांभाळता येईल. पण केंद्र सरकारने निर्यातीवर बंदी घातली. देशांतर्गत बाजारात भाव नाही, बाहेर विक्रीला बंदी – मग शेतकऱ्यांनी करायचं काय? हाच प्रश्न सोयाबीन आणि इतर पिकांचाही आहे.”पवारांनी राज्यकर्त्यांवर थेट आरोप करताना म्हटलं, “ज्यांच्या हातात राज्य आहे त्यांना शेतकऱ्याचं दुःख समजत नाही. शेतकऱ्यांच्या आक्रोशाकडे बघण्याची तयारी नाही.

गेल्या दोन महिन्यांत राज्यात तब्बल दोन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, त्यात मराठवाडा आघाडीवर आहे.
कर्जामुळे शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत; हा प्रश्न गंभीर आहे.
शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आम्ही बघ्याची भूमिका घेणार नाही.
नाशिकमधला हा मोर्चा म्हणजे फक्त सुरुवात आहे.

‘एनएचएआय’च्या अधिकाऱ्यांच्यांसोबत बैठकः कायम रहदारीचा असणाऱ्या ठिकाणी पूल बांधण्याचे निर्देश

# पुण्याच्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा मिटणार?

## चार मुख्य मागण्यांवर नितीन गडकरी काय म्हणाले आवश्यक ठिकाणी नवीन भुयारी मार्ग बनवा

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुणे-सातारा महामार्गावरील भुयारी मार्गांची रुंदी वाढवण्याचे आदेश दिले. तसेच, आवश्यक ठिकाणी नवीन भुयारी मार्ग बनवण्यास सांगितले. पुण्यातील कायम रहदारीचा असणाऱ्या ठिकाणी पूल बांधण्याबाबतही निर्देश दिलेत.**



पुणे-सातारा महामार्गावरील भुयारी मार्गाची (अंडरपास) रुंदी वाढवा; तसेच आवश्यक त्या ठिकाणी भुयारी मार्ग तयार करा, अशा सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) अधिकाऱ्यांना रविवारी दिल्या.

गडकरी यांनी ‘एनएचएआय’च्या अधिकाऱ्यांच्या रविवारी दुपारी घेतलेल्या बैठकीत पुण्यातील विविध योजनांचा आढावा घेतला. पुणे-सातारा महामार्गावर आवश्यक ठिकाणी भुयारी मार्ग तयार करण्यात आले आहेत; पण त्याची रुंदी कमी पडत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. त्यामुळे भुयारी मार्गाची रुंदी वाढवा. याशिवाय हिंजवडीपासून पुण्याकडे येणाऱ्या मार्गावर नवीन भुयारी मार्ग तयार करा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

### भूगाव बाह्यवळण मार्गाचा कार्यादेश

चांदणी चौक ते ताम्हिणी घाट रस्ता दरम्यान भूगाव बाह्यवळण मार्गाच्या कामासाठीचे कार्यादेश देण्यास रविवारी मान्यता देण्यात आली आहे. भूगाव बाह्यवळण मार्गाचे काम नऊ महिन्यांत पूर्ण करावे लागणार आहे. साधारण १८ मीटर रुंद आणि आणि ८६७ मीटर लांबीचा हा बायपास असणार आहे. यासाठी १५ कोटी विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) ९३ टक्के जागा संपादित करून दिली आहे. इतर आवश्यक असलेली जागा देण्याच्या सूचना गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

### गडकरींकडे चार मागण्या

पुणे-बेंगळुरू महामार्गांवर वाढत्या वाहनसंख्येमुळे बाणेरमधील राधा चौक, म्हाळुंगे आणि सूस गावातील मुख्य रस्त्यांवर प्रचंड कोडी निर्माण होते. हिंजवडी आयटी पार्ककडून पुण्याकडे येणारी हजारो वाहने आणि मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक या ठिकाणी अडकून पडतात, त्यामुळे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाबूराव चांदेरे यांनी गडकरी यांना सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी वाहतुकीवर दीर्घकालीन उपाय म्हणून चार ठोस मागण्या केल्या. माण व हिंजवडीकडून येणाऱ्यावाहनांना पुण्यात सहज प्रवेश मिळावा यासाठी मर्सिडीज बेंझ शोरूमजवळ भुयारी मार्ग उभारण्यात यावा. बाणेर पॅनकार्ड रस्त्यावरून सूसच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची सोय व्हावी यासाठी बिटवाइज कंपनीजवळ उड्डाणपूल उभारावा,

तसेच म्हाळुंगे गावातून येणाऱ्या वाहनांना थेट बालेवाडीमार्गे पुण्यात प्रवेश मिळावा यासाठी सुमनकीर्ती मारुती सुझुकी शोरूमजवळ आणखी एक उड्डाणपूल आवश्यक आहे. यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन गडकरींनी दिले.

### चांदणी चौकातील वाहतूक कोंडी फुटणार

पुणे-कोलाड राष्ट्रीय महामार्गावरील भूगाव बाह्यवळण रस्त्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले असून या कामाच्या प्रकल्पाला अखेर गती मिळाली आहे. पुढील नऊ महिन्यांत या बाह्यवळण रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे निर्देश केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) दिले. त्यामुळे चांदणी चौक ते भूगाव भागातील वाहतूक कोंडीतून वाहनधारकांची सुटका होणार आहे.

### रायगडकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग

भूगाव गावठाणातील रस्ता रुंद करण्यास मर्यादा असल्याने स्थानिक रहिवासी आणि प्रवाशांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे येथील स्थानिकांनी बाह्यवळण रस्त्याची मागणी केली होती. खासदार सुप्रिया सुळे यांनीही गडकरी यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. त्यानुसार एनएचएआय आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्याकडून या प्रकल्पाला गती देण्यात येणार आहे. या रस्त्यामुळे हा रस्ता रायगडकडे जाणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करेल, ज्यामुळे भूगाव गावठाण आणि भुकूम भागातील प्रवास सुकर होईल.

# येरवड्यातील कोंडी लवकरच सुटणार

## वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी 116 कोटींच्या खर्चाने उड्डाणपूल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संगमवाडी भागातून येरवडा येथे जाण्यासाठी महत्वाचा चौक असलेल्या बिंदूमाधव ठाकरे चौकातील वाहतूक कोंडी लवकरच सुटणार आहे. या चौकात उड्डाणपुलासह ‘समतल विभाजक’ (ग्रेड सेप्रेटर) उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. महापालिकेच्या स्थायी समितीने या प्रस्तावाला मंजुरी दिली. या कामासाठी सुमारे ११६ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.**




स्वागरेट, नरवीर तानाजी मालुसरे (सिंहगड) रस्ता, कोथरुड, स्वारगेट, शिवाजीनगर या शहराच्या पश्चिम आणि दक्षिण भागातून लोहगाव विमानतळ; तसेच आळंदी आणि अहिल्यानगरकडे जा-ये करण्यासाठी वाहनचालक पाटील इस्टेट येथून संगमवाडी रस्त्याचा वापर करतात. या रस्त्याने येरवडा येथील बिंदूमाधव ठाकरे चौकाचा वापर केला जातो. या चौकात दररोज सकाळी आणि सायंकाळी वाहतूक कोंडी होते. खडकीहून येरवड्याकडे जाताना, तर संगमवाडी येथून येरवडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी, विमानतळ, बंडगार्डन पुलाच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या रांगा येथे लागतात.या चौकात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन महापालिकेने बिंदूमाधव ठाकरे चौकात उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर उभारण्याचे नियोजन केले आहे. याचा प्रकल्प आराखडा महापालिकेच्या प्रकल्प विभागाने तयार करून याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवला होता. त्याला महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.या कामासाठी सुमारे ११६ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता भासणार आहे.

### ग्रेड सेपरेटर उभारला जाणार

हा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी दरवर्षी महापालिकेच्या अंदाजपत्रकात ठरवीक रक्कम ठेवण्याची हमी देखील महापालिका प्रशासनाने घेतली असल्याचे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.बिंदूमाधव ठाकरे चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर उभारला जाणार आहे.

## जीएसटी कपात


### वाहन खरेदीसाठी ग्राहकांकडून जीएसटी कमी होण्याची प्रतीक्षा

# वाहन खरेदीला अच्छे दिन!

## वाहनांच्या किमतीत सरासरी ५ ते १० टक्के कपात होण्याची शक्यता

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्र सरकारने जीएसटी कमी करण्याचा निर्णय घेतला असून हा निर्णय 22 सप्टेंबर पासून लागू होणार आहे. यानंतर वाहनांच्या दरात मोठ्या प्रमाणात कपात होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहक आता 22 सप्टेंबरची प्रतीक्षा करत आहे.**



जीएसटीच्या दरात बदल झाला आहे. २२ सप्टेंबरपासून लागू होणाऱ्या नवीन दरांमुळे घटस्थापनेच्या मुहूर्तावर आणि दसऱ्यापूर्वी नवीन वाहने खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी वाढली आहे. अनेक मॉडेल्सना दोन-तीन महिन्यांचे वेटिंग लागले आहे. यंदाच्या सणासुदीत विक्रीत २० टक्क्यांची वाढ अपेक्षित असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

जीएसटी कपातीमुळे वाहनांच्या किमतीत सरासरी ५ ते १० टक्के कपात होईल. यामुळे मध्यमवर्गीय ग्राहकांना मोठा फायदा होणार आहे. विशेषतः दुचाकी आणि छोट्या चारचाकी वाहनांवर परिणाम जास्त दिसेल. प्रमुख शोरूममध्ये गेल्या दोन दिवसांत बुकिंग दुप्पट झाल्याचे विक्रेत्यांनी नमूद केले. सणांच्या मुहूर्तावर वाहने मिळवण्यासाठी आता बुकिंग करावे लागेल," असे एका विक्रेत्याने सांगितले. केंद्राच्या घोषणेने ग्राहकांमध्ये उत्साह संचारला आहे.

### यंदा दहा टक्के जादा वाहन विक्रीचा अंदाज

विक्रेत्यांच्या अंदाजानुसार, पिंपरी-चिंचवडमध्ये यंदा २५ हजारांहून अधिक वाहने विकली जातील. गेल्या वर्षीच्या तुलनेत २० टक्के वाढ अपेक्षित आहे. कपातीमुळे दुचाकी विक्रीत ३० टक्के वाढ होईल, असे विक्रेत्यांनी सांगितले.

### सध्या दोन-तीन महिन्यांचे वेटिंग

लोकप्रिय मॉडेल्ससाठी वेटिंग वाढले आहे. दुचाकी आणि छोट्या कारसाठी आता दोन महिने लागतील, असे शोरूममधून सांगितले जाते. ऑटो पार्ट्सवरही १८ टक्के जीएसटी लागू होईल. यामुळे दुरुस्ती खर्च वाढणार नाही.

---

# पिंपरी महापालिकेच्या शाळांमध्ये आता 'आफ्टर-स्कूल'

## अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थी होणार तंत्रज्ञान साक्षर; शिक्षण विभागाचा अभिनव उपक्रम; 'टॅप'चे सहकार्य

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'डिलक्स चौक ते काळेवाडी मुख्य रस्त्यावर महापालिकेच्या जलनिस्सारण वाहिनीच्या कामानंतर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. गेल्या महिनाभरापासून रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील रहिवाशांनी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.**




पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी: पिंपरी चिंचवड महापालिकेचा शिक्षण विभाग व 'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' (टॅप) यांच्या संयुक्त विद्यमाने भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे आफ्टर-स्कूल मॉडेलचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, कॅपजेमिनी इंडियाचे एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट प्रसाद शेटये, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रतिनिधी राजश्री तिटकारे, संस्थेचे सहसंस्थापक प्रशांत कुमार, अनामिका मुखर्जी, दिनेश साळवे, जुही शहा यांच्यासह १४१ शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या १४१ शाळांमध्ये २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी आफ्टर-स्कूल मॉडेलची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिंतनशीलता, सहकार्य आणि संवाद कौशल्ये विकसित करणे असून विद्यार्थ्यांना फक्त परीक्षांसाठीच नव्हे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर भर दिला जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कला, कोडिंग, तंत्रज्ञान, आर्थिक साक्षरता यांसारख्या जीवनावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असून त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार केले जाणार आहे. त्याच अनुषंगाने अंकुशराव लांडगे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शिक्षकांना उपक्रमाची उद्दिष्टे, कार्यपद्धती, अभ्यासक्रम, विद्यार्थी व शिक्षक नोंदणी प्रक्रिया तसेच मुख्याध्यापक आणि नोडल अधिकाऱ्यांची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

> “ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुस्तकी ज्ञानासोबतच कला, कोडिंग, तंत्रज्ञान आणि आर्थिक साक्षरता यांसारखी कौशल्ये अत्यावश्यक आहेत. 'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वास वाढेल.

> “ 'दि अप्रेंटिस प्रोजेक्ट' हा उपक्रम सार्वजनिक शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करण्याचे एक मोठे पाऊल आहे. शिक्षकांचे प्रशिक्षण आणि आफ्टर-स्कूल अनुभव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देईल.
>
> –किरणकुमार मोरे,

# आंबेडकरी चळवळीची वाढ खुंटलेली कशी?



भूमिका

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिले जावे, या मागणीसाठी आंबेडकरी चळवळीने तब्बल १६ वर्षे संघर्ष केला, अनेकांच्या बलिदानानंतर अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी नामविस्तार ('डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ') करण्यात आला.**

या घटनेला यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात नामांतराचा लढा हा अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरलेला आहे. तो आंबेडकरी चळवळीसाठी केवळ चळवळीच्या अस्तित्वाचा आणि अस्मितेचा लढा नाही, तर तो वैचारिक संघर्षाचा, जातीयवादी मानसिकतेविरुद्धचा लढा आहे. या लढ्याने महाराष्ट्राचे सामाजिक, राजकीय वातावरण बदलले. त्यातूनच चळवळीत नवनवीन नेतृत्व निर्माण होऊ लागले. परंतु सामाजिक परिवर्तनाच्या आणि समतेच्या चळवळीच्या दृष्टीने या लढ्यानंतर आंबेडकरी चळवळीने जी गती घ्यायला हवी होती, ती अद्यापही दिसून येत नाही. किंबहुना पुन्हा एकदा सामाजिक, धार्मिक, जातीय, सांस्कृतिक संघर्ष अटळ बनलेला आहे. आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक काळ निर्माण झालेला आहे. म्हणून सिंहावलोकन करणे गरजेचे आहे. विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिल्यानंतर




चळवळीने एक लढा जिंकला. परंतु त्या लढ्याचे सामाजिक, राजकीय पडसाद आणि परिणाम दीर्घकालीन राहिले. चळवळीतील पोचीराम कांबळे असेल, गौतम वाघमारे असतील किंवा इतर अनेक भीमसैनिक असतील, त्यांनी दिलेले बलिदान, अनेकांच्या घरांची झालेली राखरांगोळी ही कधीही विसरता येण्यासारखी नाही. मात्र नामांतरानंतर आंबेडकरी चळवळीने सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या सुसंघटित होऊन अधिक ताकदीने विधायक प्रश्न हाती घेऊन काम करणे गरजेचे होते, ते फारसे घडताना दिसले नाही. चळवळीतील नेतृत्वाने प्रसंगानुरूप भावनिक प्रश्नांना हात घातला आणि दीर्घकालीन प्रश्न बाजूला पडले. त्यामुळे चळवळ सर्वार्थाने बळ धरू शकली नाही. पुढच्या काळात रिपब्लिकन नेत्यांच्या गटबाजीमुळे त्याचे गंभीर परिणाम दिसून आले. आंबेडकरी चळवळीला, त्यामधील रिपब्लिकन पक्ष असो वा अन्य आंबेडकरी पक्ष संघटन असोत, त्यांना एकाकी पाडले गेले. तीन दशकांमध्ये आंबेडकरी चळवळीचा दबदबा कमी होत गेला आणि संसदीय राजकारणातून आंबेडकरी पक्षांचे अस्तित्त्व संपुष्टात आल्याचे दिसून आले. वैचारिक बांधिलकीही राहिली नाही. केवळ सत्तेसाठी कुठेही धावण्याची कसरत सुरू झाली. अन्याय अत्याचाराच्या घटना कमी झाल्या नाहीत. उलट त्यात वाढ होतानाच दिसून आली. समाजासमोरचे प्रश्न दिवसागणिक वाढत चालले आहेत. नोकरी, शिक्षण या क्षेत्रांत प्रश्न जटिल झाले आहेत. त्यामुळे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते असोत अथवा जनता यांच्यापुढे वर्तमानात निरनिराळी आव्हाने उभे ठाकलेली आहेत. ते खरेच आहे. विद्यापीठाला नाव दिले गेले, मात्र ही लढाई अजूनही संपलेली नाही. या लढ्याची परिपूर्ती होण्यासाठी आंबेडकरी चळवळीने विविध प्रश्नांवर सुसंघटितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. वर्तमानात समाजातील धर्मांधता, जातीयता वाढत आहे. देशात आणि राज्यातही शोषित, वंचित, पीडित, दलित, आदिवासींवर अन्याय अत्याचाराच्या घटना सातत्याने घडत आहेत. राज्यातील बीड असो अथवा परभणी असो, या ठिकाणी घडलेल्या घटना फार वेदनादायी आहे. नामांतराच्या लढ्यातून आंबेडकरी चळवळीने कोणता बोध घेतला? या साऱ्या पार्श्वभूमीवर आंबेडकरी चळवळीने भावनिक प्रश्नांमध्ये गुंतून न पडता विधायक प्रश्न हाती घेणे, मूलभूत प्रश्नांवर लढे उभे करणे गरजेचे आहे. समाजात राजकारणासाठी अनेकजण मुद्दामहून काही भावनेशी निगडित अप्रिय घटना घडवतात आणि त्याला आंबेडकरी समुदायाकडून अपेक्षित प्रतिक्रिया येऊ लागतात. यातूनच मग क्रिया-प्रतिक्रियावादाचे राजकारण घडत राहते. किंबहुना अशा प्रकारे प्रतिक्रियावादात अडकवून ठेवले जाते. त्यामुळे मूळ प्रश्नांना बगल मिळते. महत्त्वाचे प्रश्न बाजूला पडतात आणि वेगळ्याच गोष्टींभोवती समाजकारण, राजकारण फिरत राहते.

## प्रासंगिक »

### दयावान?

***शहांचा शब्द; त्यानुसार भाजपची स्वबळावर सत्ता येईलच येईल... मग त्या वेळी अर्धी शिवसेना, अर्धी राष्ट्रवादी मिळतील ती राज्यमंत्रीपदे हाच 'बोनस' मानणार?***

आपल्याकडे राजकीय तसेच अन्य सर्वच धनिकांस दोन धर्मस्थळांचा मोह आवरता आवरत नाही. एक तिरुपती येथील बालाजी आणि दुसरे शिर्डी येथील साईबाबा. अर्थात हे असले उद्योजक कोण असतात हे सांगण्याची गरज नाही आणि त्याची चर्चा करण्याचे प्रयोजन नाही. तथापि या 'असल्या' उद्योजकांप्रमाणे राजकीय पक्षही देवदेवतांस आपले भागीदार बनवतात किंवा काय याचा शोध घ्यायला हवा. ही बाब शिर्डीस विशेष लागू होते. कारण अलीकडे अनेक राजकीय पक्षांस शिर्डी या नवतीर्थस्थानाचा मोह पडू लागला असून महाराष्ट्रातील बहुतांश राजकीय पक्षांची अधिवेशने तेथे भरताना दिसतात. कदाचित बहुतेक राजकीय पक्षांतील धनाढ्य नेते शिर्डी आणि परिसरातून येतात हेही कारण त्यामागे नसेल असे नाही. पूजा असो वा पक्षाचे अधिवेशन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मोहम्मदअली जीना, जमशेदजी कांगा, नानी पालखीवाला, सोली सोराबजी, फली नरीमन या विविध पिढ्यांतल्या नावांमधले साम्य म्हणजे, या साऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात वकिलीची कारकीर्द केली... वकील किती यशस्वी यापेक्षा किती न्यायप्रिय आहे.

# गोड बोलण्यापेक्षा, न्यायाचे बोला!

यावरच वकिली कारकीर्दीचे मोजमाप होत असते, याची जाण पुढल्या पिढीनेही जपली. इक्बाल छागला हे त्या पुढल्या पिढीपैकी ज्येष्ठ. पण वकिलीच्या उज्ज्वल कारकीर्दीत जे आदल्या पिढ्यांमधील कुणीही केले नाही, ते करण्याची धमक या इक्बाल छागलांनी दाखवली- उच्च न्यायालयातले न्यायाधीशही भ्रष्ट असू शकतात, अगदी मुख्य न्यायाधीशही पैशाच्या मोहात अडकू शकतात... अशा भ्रष्टांनी पदावरून हटलेच पाहिजे, असा ठाम आग्रह इक्बाल छागला यांनी धरला. 'छागला' हे आडनाव उच्चारताच अनेकांना 'रोझेस इ डिसेंबर' (मराठी अनुवाद : 'शिशिरातील गुलाब') या गाजलेल्या आत्मचरित्राचे लेखक आणि मुंबई उच्च न्यायालयाचे पहिले भारतीय मुख्य न्यायमूर्ती मोहम्मदअली करीम ऊर्फ एम.सी. छागला आठवतात, ते या इक्बाल छागलांचे वडील. त्या पुस्तकातल्या प्रसंगांतून सारासार विचाराचे, विवेकाचे जे धडे वाचकांना मिळतात, त्यांपैकी अनेक प्रसंगांचे इक्बाल हे साक्षीदार.




वडिलांप्रमाणेच इक्बाल छागलांनाही न्यायमूर्तीपद मिळणार होते, तेही सर्वोच्च न्यायालयात. 'मी ते स्वीकारले असते तर, सन २००३ पर्यंत सेवाज्येष्ठतेनुसार मी भारताच्या सरन्यायाधीशपदी आलो असतो... बराच विचार केला. अखेर 'व्यक्तिगत कारणांसाठी नकार' कळवून टाकला,' असे इक्बाल छागला सांगत. एरवीही अनेक प्रथितयश वकील, भरमसाट 'फी'ऐवजी न्यायाधीशांच्या तनख्वावर समाधान मानावे लागू नये अशा हिशेबाने हे पद नाकारतातच... तसेच इक्बाल यांनाही वाटले असेल म्हणणाऱ्यांनी त्यांचे 'न्यायपालिकेतील पेशांचा वारसा' या विषयाबद्दलचे विचार जरूर पाहावेत. आदली पिढी न्यायपालिकेत उच्च पदांवर असल्यास तुमच्या कारकीर्दीची सुरुवात अत्यंत सुकर होते... पण पुढे आदल्या पिढीचा लौकिक राखण्याचीच नव्हे तर वाढवण्याची अदृश्य जबाबदारी तुमच्यावर येते' असे इक्बाल छागला म्हणत. न्यायाधीशांनी स्वच्छ असावे, या आग्रहाला जागून त्यांनी एकप्रकारे, 'शिशिरातील गुलाबां'चा सुगंध द्विगुणित केला!' न्या. यशवंतराव चंद्रचूड आणि न्या. पी. एन. भगवती या दोघांपैकी कुणालाही देशाचे सरन्यायाधीशपद देऊ नका... ऐन आणीबाणीत, 'एडीएम जबलपूर' खटल्यात या दोघांनी कचखाऊ निर्णय दिला, म्हणून ते नकोत यासाठी तुम्ही आग्रह धरा' अशी गळ चाळिशीच्या उंबरठ्यावर असताना इक्बाल छागला यांनी थेट जयप्रकाश नारायण यांना घातली होती. या आग्रहाला तोवर निवृत्त झालेल्या एम. सी. छागलांचाही पाठिंबाच होता म्हणतात. 'जयप्रकाशजी तयार झाले, त्यांनी तसे निवेदन काढण्याचे वचन आम्हाला (स्वत:सह ए. जी. नूरानी यांना) दिले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

पिकांचे अतोनात नुकसान

## पुढील दोन तीन दिवस मुसळधार पावसाचे

# राज्यात पावसाचा धुमाकूळ!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात पावसाचा धुमाकूळ सुरूच असून मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्र आणि कोकणात काही ठिकाणी अतिवृष्टी झाली. त्यामुळे पिकांचेही नुकसान झाले. दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस राज्यात सर्वदूर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.**

## तीन दिवस राज्यात सर्वदूर मुसळधार



राज्याच्या विविध भागांत गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. कमी दाबाच्या क्षेत्राने त्यात भर घातली आहे. विदर्भावर निर्माण झालेल्या कमी दाब क्षेत्रामुळे सध्या राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा पहिला फटका मराठवाड्याला बसला. त्यापाठोपाठ सोलापूर, सांगलीसह मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्येही अतिवृष्टी झाली. कोकणातही अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. ठाणे, नवी मुंबईतही जोरदार पाऊस झाला. पुणे शहर आणि परिसरातही रविवारपासून पावसाचा जोर वाढला आहे. कोल्हापूर आणि महाबळेश्वर परिसरांतही पाऊस कायम होता.सध्या मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सुरू आहे, मात्र राज्यात सध्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम होत आहे. विदर्भावर निर्माण झालेले कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता आता कमी होण्याचा अंदाज असला, तरी त्यामुळे राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज आहे.राज्याच्या १३ जिल्ह्यांतील १६६ मंडळात सोमवारी अतिवृष्टी झाली. रायगड, पुणे, सातारा, सोलापूर, बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली. खडकवासल्याबरोबरच इतर काही धरणातून पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. रायगडमधील अलिबाग, चरी, चौल, नागाव, पनेवल तालुक्यातील पोयंजे, खालापूरमधील चौक, वसांबे, पेण तालुक्यामधील वाशी, महाड तालुक्यातील महाड, बिरवाडी, कारंजवाडी, नाटे, खारवली, तुडील, मांघरुण, माणगाव तालुक्यातील माणगाव, इंदपूर, गोरेगाव, लोणेरे, निझामपूर या मंडळात अतिवृष्टी झाली.

याचबरोबर सोलापूर, बीड जिल्ह्यातील काही भागात अतिवृष्टीची नोंद झाली.हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, शुक्रवारपर्यंत राज्यात विविध ठिकाणी पावसाचा जोर कायम राहणार आहे. कोकणात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात काही ठिकाणी पुढील दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. मुंबई, ठाणे, पालघर, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतही तीन दिवस जोरदार पावसाची शक्यता आहे.राज्याच्या विविध भागांत गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. कमी दाबाच्या क्षेत्राने त्यात भर घातली आहे. विदर्भावर निर्माण झालेल्या कमी दाब क्षेत्रामुळे सध्या राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा पहिला फटका मराठवाड्याला बसला. त्यापाठोपाठ सोलापूर, सांगलीसह मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्येही अतिवृष्टी झाली.कोकणातही अनेक ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. ठाणे, नवी मुंबईतही जोरदार पाऊस झाला. पुणे शहर आणि परिसरातही रविवारपासून पावसाचा जोर वाढला आहे. कोल्हापूर आणि महाबळेश्वर परिसरांतही पाऊस कायम होता.सध्या मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सुरू आहे, मात्र राज्यात सध्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम होत आहे. विदर्भावर निर्माण झालेले कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता आता कमी होण्याचा अंदाज असला, तरी त्यामुळे राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज आहे.राज्याच्या १३ जिल्ह्यांतील १६६ मंडळात सोमवारी अतिवृष्टी झाली. रायगड, पुणे, सातारा, सोलापूर, बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली. खडकवासल्याबरोबरच इतर काही धरणातून पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. रायगडमधील अलिबाग, चरी, चौल, नागाव, पनेवल तालुक्यातील पोयंजे, खालापूरमधील चौक, वसांबे, पेण तालुक्यामधील वाशी, महाड तालुक्यातील महाड, बिरवाडी, कारंजवाडी, नाटे, खारवली, तुडील, मांघरुण, माणगाव तालुक्यातील माणगाव, इंदपूर, गोरेगाव, लोणेरे, निझामपूर या मंडळात अतिवृष्टी झाली.

### पावसाला पोषक वातावरण निर्माण

याच मुद्यांवरून नेत्यांमध्येही आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे काही ठिकाणी सामाजिक समतोल ढासळत असल्याचंही चित्र पाहायला मिळत आहे.दरम्यान, राज्यातील सामाजिक ऐक्यावर आणि राज्यातील राजकीय परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिकमधील एका कार्यक्रमात बोलताना मोठं विधान केलं आहे. 'काय वाट्टेल ती किंमत मोजू, पण महाराष्ट्र एकसंध कसा राहील यासाठी प्रयत्न करू'.

# प्रवाशाकडून पैसे उकळल्याचे प्रकरण

## पश्चिम रेल्वेच्या तीन आरपीएफ पोलिसांना अटकेपासून संरक्षण

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल टर्मिनसवर एका प्रवाशाकडून पैसे उकळल्याचा आरोप असलेल्या रेल्वे पोलिस दलाच्या (आरपीएफ) तीन जवानांना उच्च न्यायालयाने सोमवारी अटकपूर्व जामीन मंजूर केला.**




गुन्हा दाखल झाल्यापासून राहुल भोसले (४७), ललित जगताप (५०) आणि अनिल राठोड (३७) हे फरारी आहेत. त्यांनी आधी अटकपूर्व जामिनासाठी सत्र न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, सत्र न्यायालयाने त्यांना कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. त्यामुळे, तिन्ही आरोपींनी वकील अनिकेत निकम यांच्यामार्फत उच्च न्यायालयात धाव घेऊन अटकेपासून संरक्षण देण्याची मागणी केली होती. न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या एकलपीठापुढे या तिन्ही आरपीएफ पोलिसांच्या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी, आपल्याला खोट्या गुन्ह्यात गुंतवण्यात आले असून गुन्हा नोंदवण्यातील विलंब पोलिसांची संशयास्पद भूमिका स्पष्ट करतो, असा दावा आरोपी पोलिसांच्या वतीने करण्यात आला. तसेच, ते त्यांचे कर्तव्ये पार पाडत होते, असा सांगताना तक्रारीत नमूद केलेली घटना अतिशयोक्ती असल्याचेही याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांण्यात आले.न्यायालयानेही आदेशात तक्रारीत नमूद घटना अतिशयोक्ती असल्याचे निरीक्षण नोंदवले व तिन्ही याचिकाकर्त्यांना २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक मुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. तपास अधिकारी चौकशीसाठी बोलावतील तेव्हा उपस्थित राहावे.

### काय प्रकरण ?

तक्रारदार आठ वर्षांच्या मुलीसह मुंबई सेंट्रल टर्मिनस येथून दुरांतो एक्स्प्रेसने परत जाणार होते. तथापि, एका पोलिसाने त्यांना सामान तपासणीसाठी थांबवले होते. तपासणीवेळी अधिकाऱ्यांना १४ ग्रॅम सोने आणि ३१ हजार रुपयांपेक्षा अधिकची रोख रक्कम आढळली, पोलिसांनी त्याबाबत केलेल्या विचारणेचे तक्रारदाराने समाधानकारक स्पष्टीकरण दिले.

## भारत व्यापार करार होणार? नवारो अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत दावा केला

# अमेरिका-भारत व्यापार करार होणार?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यापासून ते आजपर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. ट्रम्प यांच्या प्रत्येक निर्णयाची जगभरात चर्चा होते. यातच ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणाची सध्या मोठी चर्चा सुरू आहे. आतापर्यंत त्यांनी जगभरातील अनेक देशांवर अतिरिक्त आयातशुल्क लादलं आहे. भारत रशियाकडून खजिन तेल खरेदी करत असल्याचं कारण सांगत भारतावरही तब्बल ५० टक्के कराचे (टॅरिफ) ओझं टाकलेलं आहे.**

## भारताकडे मैत्रीचा हात पुढे केला



एवढंच नाही तर ट्रम्प यांनी भारताला अनेकदा डिवचण्याचाही प्रयत्न केला. मात्र, पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या दबावाला जुमानलं नाही. यातच काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी चीनचा दौरा केला आणि त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताबाबत बोलण्याचा सूर बदलल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावरून एक पोस्ट शेअर करत भारताकडे मैत्रीचा हात पुढे केला होता.त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी तथा व्हाईट हाऊसचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत मोठा दावा केला आहे. 'भारत वाटाघाटीच्या टेबलावर आहे', असं पीटर नवारो यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या दाव्यामुळेडोनाल्ड ट्रम्प नरमले का? अशी चर्चा आता रंगली आहे. दरम्यान, पीटर नवारो यांच्या या विधानामुळे भारतावरील टॅरिफ कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, भारत आणि अमेरिकेमध्ये व्यापार कराराच्या चर्चेसाठी विशेष टीम भारतात दाखल होत असल्याची देखील माहिती समोर आली आहे. त्यामुळे लवकरच दोन्ही देशांत उच्चस्तरीय बैठक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच अमेरिका आणि भारत व्यापार कराराच्या चर्चेला गती मिळणार असल्याचं बोललं जात आहे. यातच व्हाईट हाऊसचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनीही भारत वाटाघाटीच्या टेबलावर असल्याचं विधान केल्यामुळे याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे.अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी काही काही दिवसपूर्वी भाष्य करत अमेरिका भारताशी व्यापार करार करणार की नाही? याविषयी स्पष्ट भूमिका मांडली होती. हॉवर्ड लुटनिक यांनी पुन्हा एकदा संकेत दिले की भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवल्यास भारताबरोबर अमेरिका व्यापार कराराच्या संदर्भाने पुढे जाऊ शकते. "जेव्हा भारत रशियन तेल खरेदी करणे थांबवेल, तेव्हा आम्ही त्यांच्यासोबतच्या सर्व समस्या सोडवू. पण भारताने रशियन तेल आयात बंद करावी, त्यावरच पुढील प्रगती अवलंबून आहे", असं हॉवर्ड लुटनिक यांनी म्हटलं होतं. दरम्यान, व्यापार आणि ऊर्जा धोरणांवरून भारत आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेल्या तणावानंतर लुटनिक यांचे हे विधान समोर आलं असून अमेरिका-भारत संबंधांमधील तणाव कमी होण्याची शक्यता मानली जात आहे. कारण काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रिय मित्र असं संबोधलं होतं. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प हे देखील नरमले असल्याचं बोललं जात आहे. एवढंच नाही तर ट्रम्प यांनी भारताला अनेकदा डिवचण्याचाही प्रयत्न केला. मात्र, पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या दबावाला जुमानलं नाही. यातच काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदी यांनी चीनचा दौरा केला आणि त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताबाबत बोलण्याचा सूर बदलल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावरून एक पोस्ट शेअर करत भारताकडे मैत्रीचा हात पुढे केला होता.त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी तथा व्हाईट हाऊसचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी अमेरिका-भारत व्यापार कराराबाबत मोठा दावा केला आहे. 'भारत वाटाघाटीच्या टेबलावर आहे', असं पीटर नवारो यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या दाव्यामुळेडोनाल्ड ट्रम्प नरमले का? अशी चर्चा आता रंगली आहे. दरम्यान, पीटर नवारो यांच्याभारतावरील टॅरिफ कमी होण्याची शक्यता व्यक्त केली.

### विशेष टीम भारतात दाखल

या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, भारत आणि अमेरिकेमध्ये व्यापार कराराच्या चर्चेसाठी विशेष टीम भारतात दाखल होत असल्याची देखील माहिती समोर आली आहे. त्यामुळे लवकरच दोन्ही देशांत उच्चस्तरीय बैठक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच अमेरिका आणि भारत व्यापार कराराच्या चर्चेला गती मिळणार असल्याचं बोललं जात आहे.

# चिनी TIKTOK ला अमेरिकेत नवसंजीवनी

## डोनाल्ड ट्रम्प यांनी दिले 'डील' झाल्याचे संकेत

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शॉर्ट व्हिडीओ प्लॅटफॉर्मवर सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या टिकटॉक ॲपवर अनेक देशात बंदी आहे. भारताने देखील २०२० मध्ये टिकटॉक ॲपवर बंदी घातलेली आहे. अमेरिकेत देखील टिकटॉकवर बंदी घालण्यात आलेली आहे. अमेरिकेत टिकटॉकवरील बंदीचं प्रकरण तर थेट अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलं होतं. दरम्यान, आता चिनी टिकटॉकबाबत मोठी माहिती समोर आली आहे.**





अमेरिकेत चिनी टिकटॉकला आता नवसंजीवनी मिळण्याची शक्यता आहे. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या संदर्भातील डील झाल्याचे संकेत दिले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी संकेत दिले की टिकटॉकला अमेरिकन बाजारपेठेत काम सुरू ठेवण्यासाठी चीनबरोबर डील झाली आहे.

तसेच त्यांच्या प्रशासनाने चिनी ॲपला अमेरिकेच्या मालकीच्या अटींचं पालन करण्यासाठी १७ सप्टेंबरची अंतिम मुदत दिली होती, असं म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी या संदर्भात अधिक तपशील सांगितलेले नाहीत.

मात्र, ट्रुथ सोशलवर पोस्टमधून सूचक भाष्य करत संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी म्हटलं की, एका विशिष्ट कंपनीबाबतही तोडगा निघाला, ज्याला आपल्या देशातील तरुण वाचवू इच्छित होते. तसेच चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी शुक्रवारी आपण याबाबत संवाद साधणार असल्याचंही डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं आहे.

### कंपनीबाबतही तोडगा निघाला

युरोपमध्ये अमेरिका आणि चीन यांच्यातील मोठी व्यापार बैठक खूप चांगली झाली आणि ती लवकरच संपेल, असंही ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. मात्र, याबाबत व्यापार करारासाठी दोन्ही बाजूंनी चर्चा होत असताना चीनकडून कोणतीही पुष्टी मिळाली नाही. मात्र, या अजेंड्यात सोशल मीडिया दिग्गज कंपनीचे भवितव्य समाविष्ट होतं अशी माहिती समोर आली आहे.



# रणबीर आणि आलिया न्यूयॉर्कहून परतले



मुंबई विमानतळावर अनेक सेलिब्रिटी दिसले. बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टही पती रणबीर कपूरसोबत स्टायलिश लूकमध्ये विमानतळावर दिसली. याशिवाय दिग्गज अभिनेते अनिल कपूर, सोनू सूद, शमिता शेट्टी आणि नुसरत भरुचा हे देखील स्पॉट झाले होते. अलीकडच्या रॉकी और रानी की प्रेम कहानी आणि हॉलिवूड रिलीज हार्ट ऑफ स्टोनच्या यशानंतर आलिया सध्या रणबीरसोबत न्यूयॉर्कला सुट्टीवर गेली होती. या काळातील अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. आता दोघेही मुंबईला परतले आहेत. शुक्रवारी हे जोडपे मुंबई विमानतळावर स्पॉट झाले. जिथे दोघेही खूप मस्त आणि कम्फर्टेबल लूकमध्ये दिसले आलिया व्हाईट ओव्हरसाईज टी-शर्ट आणि ब्लॅक पँटमध्ये दिसली. काळ्या गॉगल आणि पांढऱ्या शूजने तिने हा लूक पूर्ण केला. तर रणबीर ऑल ब्लू ट्रॅक सूटमध्ये दिसला होता, ज्यामध्ये तो खूपच सुंदर दिसत होता. त्याला पाहताच चाहत्यांनी त्याला चारही बाजूंनी घेरले. त्यानंतर दोघांनीही विमानतळावर चाहत्यांसमोर जोरदार पोज दिल्या. ६६ वर्षीय अनिल बॉलिवूड इंडस्ट्रीतील सर्वात फिट अभिनेत्यांपैकी एक आहे. विमानतळावर तो खूपच देखणा आणि तरुण दिसत होता. चाहत्यांना पाहून अभिनेत्याने त्यांना नमस्कार केला आणि त्यांच्यासोबत सेल्फीही घेतला. नुसरत भरुचाही विमानतळावर स्टायलिश लूकमध्ये दिसली. तिच्या लूकबद्दल बोलायचे झाले तर तिने काळ्या स्वेट शर्टसोबत गुलाबी ट्राउजर घातला होता. आत गेल्यानंतर पापाराझींसाठी हसतमुख पोझ दिली.

## आर्यनने शाहरुख खानला केले मोटिव्हेट

शाहरुख खान आणि त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जवान' चित्रपटाच्या टीमने नुकतीच मुंबईत एक गेट टुगेदर आयोजित केले होते. यावेळी चित्रपटातील कलाकार आणि क्रूचे सर्व सदस्य एकत्र दिसले. या कार्यक्रमात शाहरुखने तो ब्रेकवर होता तेव्हा त्याला चित्रपटांमध्ये परतण्यास कोणी प्रवृत्त केले हे सांगितले. 'झिरो' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर शाहरुखने 2019 मध्ये 3 वर्षांचा ब्रेक घेतला होता. या कार्यक्रमात शाहरुख म्हणाला, 'मी खूप नर्व्हस होतो कारण मी इतकी वर्षे काम केले नाही. तीन वर्षांनंतर चित्रपटाच्या सेटवर परतणे माझ्यासाठी पूर्णपणे नवीनच होते. त्यावेळी माझा मुलगा आर्यन मला म्हणाला – जेव्हा आम्ही मोठे होत होतो तेव्हा तुमचे स्टारडम काय असते हे आम्हाला माहिती होते.. तुमचे स्टारडम काय आहे हे सुहानालाही माहिती होते. पण या छोट्याला (अबराम खान) फक्त तुम्ही स्टार आहात हे माहिती आहे, त्याला तुमचे स्टारडम कधीच जाणवले नाही. त्यामुळे पुढील 5 चित्रपटांसाठी एवढी मेहनत करा की त्याला हे जाणवेल. या कार्यक्रमात शाहरुखने असेही सांगितले की, तो गेल्या 29 वर्षांपासून चित्रपट यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेत आहे.

## नुसरतसह 17 सेलिब्रिटींची ईडी चौकशी



ईडी 5,000 कोटी रुपयांच्या मनी लाँड्रिंग प्रकरणात दुबईतून ऑनलाइन सट्टेबाजी ॲप चालवणारा सौरभ चंद्राकर आणि त्याचा व्यवसाय भागीदार रवी उप्पल यांची चौकशी करत आहे. आता या प्रकरणात टायगर श्रॉफ, नुसरत भरुचा, सुखविंदर सिंग, नेहा कक्कर आणि सनी लिओनसह 17 सेलिब्रिटींचीही चौकशी होऊ शकते. ईडीच्या तपासात सौरभ चंद्राकरचे फेब्रुवारीमध्ये लग्न झाले आणि त्यासाठी २०० कोटी रुपये खर्च झाल्याचे आढळून आले. हवालाच्या माध्यमातून हा पैसा इव्हेंट कंपनी आणि बॉलिवूड स्टार्सपर्यंत पोहोचला. हे अभिनेते आणि गायक या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव बुक ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांच्या लग्न समारंभात सहभागी झाले होते. दुबईत झालेल्या या लग्नात सौरभने 200 कोटी रुपये खर्च केले. या सर्व सेलिब्रिटींनीही यावेळी परफॉर्म केले. या प्रकरणात टायगर श्रॉफ, सनी लिओन, नुसरत भरुचा, नेहा कक्कर, आतिफ अस्लम, राहत फतेह अली खान, अली असगर, विशाल ददलानी, एली अबराम, भारती सिंग, भाग्यश्री, क्रिती खरबंदा, कृष्णा अभिषेक आणि सुखविंदर सिंग यांच्यासह अनेक सेलिब्रिटी आहेत. चौकशी केली जात आहे. छत्तीसगडचे रहिवासी सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल हे मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात वॉन्टेड आहेत. सौरभ एकेकाळी छत्तीसगडमधील भिलाई येथे ज्यूस विकायचा. ईडीच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर चंद्राकरने रोजी दुबईतील 7 स्टार हॉटेलमध्ये पार्टी दिली होती.

या पार्टीला काही बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली, ज्यासाठी त्यांनी 40 कोटी रुपये आकारले.या वर्षी फेब्रुवारीमध्ये झालेल्या लग्नासाठी सौरभने आपल्या कुटुंबीयांना नागपूरहून दुबईला खासगी जेटने बोलावले होते. मुंबईहून बॉलिवूड सेलिब्रिटी, वेडिंग प्लानर, डान्सर्स आणि डेकोरेटर्सही दुबईला पोहोचले. या लग्नात या 17 सेलिब्रिटींनी परफॉर्म केले होते. गेल्या वर्षी डिसेंबरपासून सुरू असलेल्या या प्रकरणाच्या तपासात आता बॉलिवूड कनेक्शन समोर आले आहे. महादेव ऑनलाइन बेटिंग ॲप हे एक गेम ॲप आहे जे 30 केंद्रांवरून ऑपरेट केले जाते. आता त्याचे प्रवर्तक दुबईत आहेत जेथे फलंदाजी बेकायदेशीर आहे. शुक्रवारी या प्रकरणी ईडीने भोपाळ, मुंबई आणि कोलकाता येथील 417 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

## शाहरुखच्या जबरा फॅनची कमाल!

बॉलिवूडचा बादशहा शाहरूख खानचा जवान चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ करत असल्याचे पाहायला मिळत आहे. चित्रपट रोज कमाईचे नवे विक्रम करत असल्याचे समोर येत आहेत. मात्र या चित्रपटासाठी चाहत्यांची उत्सुकतादेखील चर्चेचा विषय ठरत आहे. शाहरूखच्या अशाच एका जबरा फॅनची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. शाहरूखच्या या खास चाहत्याचे नाव आहे. अनिस फारुकी. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या या फॅनने चक्क व्हेंटिलेटर थिएटरमध्ये नेत त्याठिकाणी जवान चित्रपटाचा आनंद लुटला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर त्याने त्याबाबतचा व्हिडिओ शेअर केला असून तो व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये शाहरूखचा एक डायलॉग असलेला व्हिडिओ आहे. हाड डायलॉग पाहण्यासाठीच एवढा सगळा प्रपंच केल्याचे सांगत अनिस बरोबर असलेल्या एकाने हा व्हिडिओ शेअर केला आहे. सोशल मीडियावर अपलोड झाल्यापासून या व्हिडिओला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.



## अनिल कपूरने भूमीसोबत रिक्रिएट केले आयकॉनिक गाणे

अभिनेत्री अंकिता लोखंडेने अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते.

**एमसीसी नियमांचे उल्लंघन**

## हस्तांदोलन न करण्याच्या मुद्द्यावर ICC देणार झटका

# पाकिस्तान पुन्हा तोंडावर पडणार!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यानंतर हस्तांदोलन न करण्यावरून झालेला वाद शिगेला पोहोचला आहे. १४ सप्टेंबरला आशिया चषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना खेळवला गेला, या सामन्यात भारताने ७ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. पण या सामन्यानंतर टीम इंडियाच्या कोणत्याच खेळाडूंनी पाकिस्तान संघाच्या खेळाडूंबरोबर हस्तांदोलन केलं नाही. या मुद्द्यावर मोठा वादंग पेटला आहे.**

### पथुम निसंकाने५० धावांची खेळी केली




पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) हा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना स्पर्धेतून काढून टाकण्याची विनंती केली आहे. पीसीबीचा दावा आहे की मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांनी दोन्ही कर्णधारांना नाणेफेकीदरम्यान हस्तांदोलन न करण्यास सांगितले होते. या घटनेबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) मॅच रेफरी बदलण्याच्या मागणीवर आयसीसीने अद्याप कोणतंही अधिकृत निवेदन जारी केलेलं नाही. परंतु क्रिकबझच्या वृत्तानुसार, आयसीसीने हा प्रस्ताव नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. पीसीबीने आरोप केला आहे की पायक्रॉफ्टने खेळभावनेच्या दृष्टीने आयसीसी आचारसंहिता आणि एमसीसी नियमांचे उल्लंघन केले आहे.रिपोर्ट्सनुसार, आयसीसीचं असं मत आहे की हस्तांदोलनाच्या घटनेत पायक्रॉफ्टचा फारसा सहभाग नव्हता आणि त्याने फक्त पाकिस्तानच्या कर्णधाराला संदेश देण्याचं काम केलं होतं. जेणेकरून नाणेफेकीदरम्यान एका कर्णधाराने दुसऱ्या कर्णधाराशी हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यास सर्वांसमोर होणारी लाजिरवाणी स्थिती टाळता येईल. तर, सामान्य मत असं आहे की एखाद्या सदस्याच्या मागणीवरून सामनाधिकारी बदलणं हे चुकीचं ठरेल आणि मग तशी परंपरा पुन्हा सुरू राहील, कारण सामनाधिकाऱ्यांची या प्रकरणात कोणतीही गंभीर भूमिका नव्हती. पीसीबीने इशारा दिला आहे की, जर त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर ते १७ सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमिराती (यूएई) विरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकू शकतात. या सामन्यासाठी पायक्रॉफ्टची पंच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, ज्यामुळे पाकिस्तान हा सामना खेळणार की नाही; यावर सर्वांच्या नजरा आहेत. सुपर-४ च्या शर्यतीच्या दृष्टीने हा सामना दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा आहे. जो संघ हा सामना हरेल तो स्पर्धेतून बाहेर पडेल.पाकिस्तानने आतापर्यंत दोन सामने खेळले आहेत आणि त्यापैकी एक जिंकला आहे आणि दुसरा गमावला आहे. निर्णय बदलल्यानंतरही जर पाकिस्तानी संघ पुढचा सामना खेळला तर तो अधिक चर्चेचा विषय ठरेल. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) हा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना स्पर्धेतून काढून टाकण्याची विनंती केली आहे. पीसीबीचा दावा आहे की मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांनी दोन्ही कर्णधारांना नाणेफेकीदरम्यान हस्तांदोलन न करण्यास सांगितले होते. या घटनेबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या (पीसीबी) मॅच रेफरी बदलण्याच्या मागणीवर आयसीसीने अद्याप कोणतंही अधिकृत निवेदन जारी केलेलं नाही. परंतु क्रिकबझच्या वृत्तानुसार, आयसीसीने हा प्रस्ताव नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. पीसीबीने आरोप केला आहे की पायक्रॉफ्टने खेळभावनेच्या दृष्टीने आयसीसी आचारसंहिता आणि एमसीसी नियमांचे उल्लंघन केले आहे.रिपोर्ट्सनुसार, आयसीसीचं असं मत आहे की हस्तांदोलनाच्या घटनेत पायक्रॉफ्टचा फारसा सहभाग नव्हता आणि त्याने फक्त पाकिस्तानच्या कर्णधाराला संदेश देण्याचं काम केलं होतं. जेणेकरून नाणेफेकीदरम्यान एका कर्णधाराने दुसऱ्या कर्णधाराशी हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यास सर्वांसमोर होणारी लाजिरवाणी स्थिती टाळता येईल.

### सामन्यावर बहिष्कार टाकू

एखाद्या सदस्याच्या मागणीवरून सामनाधिकारी बदलणं हे चुकीचं ठरेल आणि मग तशी परंपरा पुन्हा सुरू राहील, कारण सामनाधिकाऱ्यांची या प्रकरणात कोणतीही गंभीर भूमिका नव्हती.पीसीबीने इशारा दिला आहे की, जर त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर ते १७ सप्टेंबर रोजी संयुक्त अरब अमिराती (यूएई) विरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकू शकतात.

# टीम इंडियाची सुपर फोरमध्ये धडक

## युएईमुळे पाकिस्तानवर स्पर्धेबाहेर होण्याची भिती; कसं आहे समीकरण?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ मध्ये संयुक्त अरब अमिराती (युएई) संघाने आज १५ सप्टेंबरला झालेल्या सामन्यात ओमानचा पराभव केला आहे. युएईच्या विजयामुळे अ गटातील सुपर फोर गाठण्याची स्पर्धा अधिक चुरशीची झाली आहे. अ गटात भारत, पाकिस्तान, युएई आणि ओमान संघ आहेत.**



भारतीय संघ २ सामन्यांत २ विजयांसह अव्वल स्थानावर आहे. त्यामुळे टीम इंडिया अधिकृतपणे सुपर-४ मध्ये पोहोचली आहे.आता १७ सप्टेंबर रोजी पाकिस्तान आणि यूएई यांच्यात होणारा सामना नॉकआउट सामना असणार आहे आहे. या सामन्यामुळे सुपर-४ मध्ये कोण पोहोचणार हे ठरवलं जाईल. तर ओमानचा संघ दोन्ही सामने गमावत सुपर फोर गाठण्याच्या शर्यतीतून बाहेर झाला आहे.संयुक्त अरब अमिराती संघाचे २ सामन्यांत २ गुण आहेत. पाकिस्तानचेही २ सामन्यांत २ गुण आहेत. सुपर-४ मध्ये पोहोचण्यासाठी यूएईला पाकिस्तानला कोणत्याही परिस्थितीत पराभूत करावं लागेल. जर असं झालं तर युएई ४ गुणांसह सुपर-४ मध्ये पोहोचेल.पाकिस्तान आणि यूएई यांच्यात आतापर्यंत ३ सामने झाले आहेत. पाकिस्तानने यापैकी तिन्ही सामने जिंकले आहेत. आशिया चषकापूर्वी दोन्ही संघ तिरंगी मालिकेत आमनेसामने होते. पाकिस्तानने यादरम्यान २ वेळा यूएईचा पराभव केला. युएईसाठी पाकिस्तानला हरवणं कठीण असू शकतं, पण ते अशक्य नाही. पाकिस्तानचा संघ अनेकदा अपसेटचा बळी ठरला आहे. टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये अमेरिकेच्या संघाने पाकिस्तानचा पराभव केला होता आणि संघाला गट टप्प्यातून बाहेर पडावं लागलं

### युएईला काय करावं लागणार?

भारत आणि युएईचा संघ सुपर फोरमध्ये जाऊ शकतात. अन्यथा पाकिस्तानने युएईचा पराभव केला तर भारत आणि पाकिस्तानचे संघ सुपर फोर गाठतील. यासह भारत आणि पाकिस्तानचे संघ पुन्हा एकदा आमनेसामने येतील.भारताला १९ सप्टेंबरला ओमानविरुद्ध गट टप्प्यातील शेवटचा सामना खेळायचा आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार ।
। दि. 16 सप्टेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### आंतरराष्ट्रीय करिअरमधील अनुभव विद्यार्थ्यांशी केले शेअर

# जागतिक स्पर्धेत नवनवीन कौशल्य गरजेची- चोयोन निओगी

## शिक्षण विश्व: 'एमआयटी'मध्ये "परदेशात नोकरीच्या संधी" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**जागतिक स्पर्धेच्या युगात स्वतःला सिद्ध करण्यासाठी सतत नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. असे मत जर्मन स्त्रीत मर्सिडीज बेंज कंपनीचे अभियंता चोयोन निओगी यांनी व्यक्त केले.**



एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये अफलाटस क्लब (विद्यार्थी व्यवहार विभाग) यांच्या वतीने "परदेशी देशांमध्ये नोकरीच्या संधी" या विषयावर एक माहितीपूर्ण व मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. जर्मनीतील मर्सिडीज-बेंझ कंपनीतील अभियंता चोयोन निओगी यावेळेस उपस्थित होते. निओगी हे एमआयटी एसीएससीचे माजी विद्यार्थी असून, त्यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय करिअरमधील अनुभव विद्यार्थ्यांशी दिलखुलासपणे शेअर केले. या सत्रात त्यांनी परदेशात उच्च शिक्षण घेऊन नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक तयारी, भाषा कौशल्य, तांत्रिक आणि सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व, तसेच करिअरमध्ये सातत्यपूर्ण प्रगती साधण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींवर सखोल मार्गदर्शन केले. जागतिक स्पर्धेच्या युगात स्वतःला सिद्ध करण्यासाठी सतत नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

परदेशात नोकरी करताना मिळणाऱ्या संधी, जसे की उच्च वेतन, आंतरराष्ट्रीय अनुभव, व्यावसायिक वाढ, सांस्कृतिक समृद्धी आणि वैयक्तिक विकास या बाबींवर त्यांनी प्रकाश टाकला. व्याख्यानाच्या समारोपात नेटवर्किंगच्या महत्त्वावर भर देताना त्यांनी सांगितले की, "तुमचे नेटवर्क हीच तुमची निव्वळ संपत्ती आहे; जागतिक संधी शोधण्यासाठी प्रभावी कनेक्शन तयार करा."

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक डॉ. बी बी वाफारे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. कार्यक्रमाच्या संयोजनात अफलाटस क्लबच्या समन्वयक कविता शिंदे यांचा विशेष सहभाग होता. तसेच असोसिएट डीन डॉ. सुनील महाजन, प्रा. अनुपमा अलगणवार, प्रा. ऋषिकेश चिकणे, प्रा. सचिन झेंडे आणि प्रा. शितल शेवकरी यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंशू बेबी आणि वैष्णवी लोणकर यांनी केले. त्यांनी उपस्थितांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि परदेशी करिअरबाबत नव्या दृष्टीकोनाने विचार करण्यास सुरुवात केली.

# विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेबाबत जागरूकता!

## शिक्षण विश्व: एमआयटी एसीएससीचा उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आळंदी येथील एमआयटी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या व्यवसाय प्रशासन आणि आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागाने ११ ते १३ सप्टेंबर २०२५ दरम्यान एक महत्त्वपूर्ण समुदाय संपर्क उपक्रम राबवला. या उपक्रमांतर्गत आळंदी नगरपरिषदेच्या शाळा क्रमांक ३ काळेवाडी येथे तीन दिवसांची आर्थिक साक्षरता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.**



या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना आर्थिक ज्ञानाच्या मूलभूत बाबींची ओळख करून देण्यात आली. पैशांचे व्यवस्थापन, ध्येय निश्चिती, बजेटिंग, बचत, गुंतवणूक, विमा, आर्थिक फसवणूक ओळखण्याची क्षमता आणि कर प्रणालीची प्राथमिक माहिती या विषयांवर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यशाळेत प्रात्यक्षिके, परस्परसंवादी सत्रे आणि प्रश्नमंजुषा यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या उपक्रमाचे समन्वयक डॉ. ऋतुजा देशपांडे होत्या, त्यांना मृदुल पांडे यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून साथ दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. बी बी वाफारे संचालक डॉ. आक्षदा कुलकर्णी उपसंचालक डॉ. मानसी अतितकर उपसंचालक डॉ. अमोल माने डीन स्कूल ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट आणि श्रीमती आकांक्षा लांडगे विभागप्रमुख बीबीए बीबीए आयबी यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लवकरच आर्थिकदृष्ट्या जबाबदार नागरिक घडवण्याच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले असून समुदायाशी महाविद्यालयाचा संबंध अधिक दृढ करण्यात यश मिळाले आहे.

DYP Dr. D. Y. PATIL COLLEGE OF AGRICULTURE BUSINESS MANAGEMENT, AKURDI, PUNE

Institute Code: 18197

# TRAINING & PLACEMENT CELL

ORGANIZED



## STUDENTS INTERACTION SESSION UNDER

Industry and Academic Integration for Industry's Demands & High Employability

## IN COLLABORATION WITH

## KHET PE - SWAN ENERGY LTD.



Date: 3rd Sep 2025
Time: 11.00am to 12.30pm
Venue: MCA Seminar Hall

www.dypagribusiness.ac.in | info.dypagribusiness.ac.in | @dypabmakaurdi | @dypcabm | @dypabm


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046